MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

## रुग्णांशी बेशिस्त वर्तन करणाऱ्या व एकरी भाषा वापरणाऱ्या डॉ. किशोर रत्नपारखी यांच्या चौकशीसाठी जिल्हा शैल्य चिकित्सक ( सि एस ) कडून समिती गठीत

माजलगाव /प्रतिनिधी

ग्रामीण रुग्णालय, माजलगाव येथे कार्यरत असलेले डॉ. किशोर रत्नपारखी यांनी अशोक भिमराव घडसिंगे यांना एकेरीवर येऊन आरेरावीचे भाषा वापरत शासकिय कामात अडथळा केल्याबाबतचा गुन्हा नोदंवण्याची धमकी देत जातीवाचक भाषा करून एकेरी शब्दात रुग्ण विर व संबंधितांना अपमानित केले होते त्याची तक्रार संबधिताने किशोर रत्नपारखी यांचे विरुध्य कार्यवाही करणे बाबत मा. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचा ई-मेल दिनांक २९.०७.२०२४ रोजी पाठवला होता याची दखल घेत जिल्हा शैल्य चिकित्सक ( सि एस ) यांनी या तक्रारीची दखल घेत त्री सदस्य समिती स्थापन करून या समितीचा अहवाल मागवला आहे.मागील काही दिवसापासून माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील काही जातिवादी मानसिकतेत असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमुळे माजलगाव ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना खूप मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे. याबाबत कित्येक वर्तमानपत्रातही बातम्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. या अगोदर पण गरोदर स्त्रियांना बेड उपलब्ध न करता जमिनीवर (फरशी )झोपवले जाते .लाखो रुपये खर्चून कोविड सेंटरच्या नावाखाली वीस ते बावीस गरज नसलेले बेड लावण्यात आलेले आहेत मात्र डिलेवरीसाठी गरोदर मातांना वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जावे लागत असते, या रुग्णालयात ना एक्स-रे मशीन सुरू आहे ना वेळीच कुठली सुख सुविधा उपलब्ध आहे अशा वेगवेगळ्या समस्यांनी ग्रासलेल्या माजलगाव ग्रामीण रुग्णालयांना डॉ. किशोर रत्नपारखी सारख्या डॉक्टरांनी जनु बदनाम करण्याचा विडाच उचलला आहे त्यामुळे त्यांच्यावर योग्य वेळी योग्य कारवाई होणे अपेक्षित आहे असं रुग्णालयात येणाऱ्या जाणाऱ्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकातून बोलले जात आहे.वर्तमानपत्रातील बातम्या मेल व अर्जाद्वारे आलेल्या तक्रारीची दखल जिल्हा शल्य शैल्य चिकित्सक ( सि एस ) यांनी तात्काळ दखल घेऊन आपली कर्तव्यदक्षता दाखवली आहे आणि तात्काळ समिती नेमून जी वस्तुस्थिती असेल त्याबद्दल अहवाल लवकरात लवकर सादर करण्याच्या सूचना त्या समितीला केल्या आहेत .त्या मुळे पुन्हा एकदा तक्रार छोटी असो की मोठी त्यावर तात्काळ क्शन घेणाऱ्या कर्तव्यदक्ष माजी जिल्हा शैल्य चिकित्सक ( सि एस ) डॉ. सुरेश साबळे यांची आज आठवण झाली.

बीड (महाराष्ट्र) सायं.दैनिक मराठी वर्ष -०१ अंक -३०८ बुधवार दि.३१ जुलै २०२४ आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ किंमत ३ रु । पाने ४
Beed (Maharashtra) Daily Evening MARATHI Year-01 Issue -308 WEDNESDAY DT. 31 JULY 2024 RNI : MAHMAR/2023/83965 PRICE - 3 RUPEES PAGES - 4

# मुख्याधिकारी नीता अंधारेनी एक महिना उलटून गेला तरी सलीम ट्रेसर उत्कर्ष गुट्टेच्या हिंदू समशानभूमी संदर्भातील अहवाल कलेक्टरला दिलाच नाही?

## सलीम ट्रेसर उत्कर्ष कुठे यांचा नंगानाच मुख्यमंत्र्यांकडे तक्रार एक महिन्याचा कालावधी लोटला तरी बीड नगर परिषदेकडून कारवाई नाही









**लहान मुलांच्या समशानभूमीची जागाही अवैद्य प्रकारे भगवान बाबा प्रतिष्ठानला रस्त्यासाठी केला कब्जा ?**

**शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मुख्यमंत्र्यांकडे सलीम ट्रेसर उत्कर्ष गुट्टेच्या विरोधात केली तक्रार बीड नगरपरिषदचे अनेक भूखंडामध्ये मोठा गैरव्यवहार करत गुत्तेदारांच्या घशात घातली. ?**

**बीड नगरपरिषदचा सलीम ट्रेसर म्हणजे राजकीय नेत्यांच्या आर्थिक तडजोडीत निवडणुकीच्या काळामध्ये फायनान्सर असल्याची चर्चा बीड शहरात ?**

**उत्कर्ष गुट्टे सलीम ट्रेसर चा कारभार भोंगळा परंतु उत्कर्ष कुठे कोण तारत आहे. तो राजकीय नेता कोण ?**

बीड (प्रतिनिधी)

बीड शहरातील अनेक भागांमध्ये बीड नगर परिषदेतील तत्कालीन मुख्याधिकारी उत्कर्ष गुट्टे व सलीम ट्रेसर उर्फ डिके यांनी अक्षरशः नंगानाच चालवत बीड शहरातील अनेक भूखंडाचे चतुर्सीमा बदलून यामध्ये घोटाळा केलेला आहे. या भूखंडामध्ये मात्र आज पर्यंत गोरगरिबांचे मुडके मोडण्याचे काम बांधकाम परवाना असेल किंवा गुंठेवारी असेल येणे आऊट असेल कोणतेही कामगिरी घेऊन गेला तर त्या कामाला बीड नगर परिषदेचा सलीम ट्रेसर म्हणजे बीड शहराचा सातबारा स्वतःच्या आई बापाच्या नावावर असल्यासारखा वागत होता याने तर आता अक्षरक्षा नगानाच करून बीड शहरातील हिंदू समशान भूमीची जागा हडप केली आहे यात भगवान बाबा प्रतिष्ठान शेजारी असलेल्या हिंदू स्म्शानभूमीच्या चतुरसीमेत बदल करण्यासोबतच अनेक कुटाणे करणाऱ्या ट्रेसर सलीम उर्फ डिके याच्यावर कारवाई केली तर काही कमिशन भेटणार नाही किंवा टक्केवारी मिळणार नाही म्हणून मुख्याधिकारी नीता अंधारे त्याला पाठीशी घालत आहेत का? अशी चर्चा सर्वसामान्य माणसात सुरु आहे.

बीड नगर परिषदेत सलीम ट्रेसर हणून नोकरीस असलेल्या सलीम उर्फ डिके याच्यावर अनेक प्रकरणात गंभीर आरोप झालेले आहेत. सर्व्हे नंबर ११९ मधील कुटाणा असो कि भगवान बाबा प्रतिष्ठान नजिक असलेल्या स्मशानभूमीची चतु सीमा बदलण्याचा प्रकार असो. सलीम बाबत अनेक तक्रारी आहेत. थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकरणात गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

या गोष्टीला महिना उलटला तरीदेखील अद्याप कसलीच कारवाई मुख्याधिकारी नेता अंधारे यांच्याकडून झालेली नाही. उलटपक्षी अनेक बेकायदेशीर कामे ट्रेसर सलीम च्या सांगण्यावरून त्यांनी केले आहेत. कोणत्याही कामात त्यांना टक्केवारी लागते तरच काम होते अशी चर्चा आहे. त्यामुळेच सलीम वर कारवाई केली तरी काहीच पदरात पडणार नाही हे लक्षात आल्याने मुख्याधिकारी नीता अंधारे नी त्याच्यावर कारवाई करत नसल्याची चर्चा सुरु आहे. तक्रारदारांनीच आता यामध्ये काही टक्केवारी गोळा करून द्यावी. सर्वसामान्यांच्या तोंडचा घास पळून मोठ्या मोठ्या बिल्डर लोकांना बीड शहरातील मोत्याच्या जागा लेआउट असेल किंवा सलीम ट्रेसरचा कोणताही कारभार असेल गुंठेवारी असेल अनेक कोट्यावधी रुपयाची हजारो बांधकाम बीड शहरामध्ये आवेद्य चालू परंतु हे सर्व सलीमच्या टक्केवारी वरती खेळ चालू आहे तक्रारदारांनी यावेळी आता टक्केवारी देऊन आपले काम करून घेण्याची वेळ यावेळी आली आहे किंवा मुख्याधिकारी नीता अंधारे यांना टक्केवारी घेतल्याशिवाय काम करून सलीमवर कारवाई करण्याची चर्चा सुरू आहे जर टक्केवारी गेली तर ही कारवाई होऊ शकते अशी चर्चा बीड शहरातील जनतेच्या तोंडून ऐकायला मिळत आहे.

तत्कालीन मुख्याधिकारी उत्कर्ष गुट्टे बीड नगर परिषदेचा सलीम ट्रेसर उर्फ डिके यांनी हजारो बांधकामांना परमिशन दिलेली आहे परंतु ही परमिशन आता फक्त कागदावरच दिसून येत आहे ही परमिशन कुठल्याही नियमाला धरून नाही तर गुंठेवारी मध्ये असेल किंवा सलीम ट्रेसर चा कोणताही कारभार असेल कुठे असतील किंवा मुख्याधिकारी नीता अंधारे असतील या सर्वांनी मिळून सलीमच्या पाठीशी उभा राहून आपला आर्थिक भार जास्त करून स्वतःचा खिसा भरण्याचे काम यावेळी केले आहे सलीम ट्रेसरच्या अंधारे मॅडम यांच्या कार्यकाळातील व उत्कर्ष कोट्यावधी रुपयाच्या भूखंडाचे व अनेक कामांमध्ये या कार्यकाळातील सलीम ट्रेस यांनी केलेली एकूण किती असे अनेक प्रकार उघडकीस येतील बीड शहरातील अनेक जमिनींच्या कागदा पत्रांमध्ये सलीम ट्रेसरने वेगवेगळ्या मुख्याधिकारी यांना हाताशी धरून घोटाळे केले आहेत याचा फरक दिसून येईल व किती घपळा झालेला आहे हे चित्र स्पष्ट होईल यातील मात्र शंका नाही.

बीड शहरातील संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या पाठीमागील हिंदू समशानभूमी आहे या हिंदू स्मशान भूमिची चतुर सीमा बदलून ती एका भू माफीया च्या घशात घालण्याचं काम यावेळी सलीम ट्रेसर उर्फ डिके तत्कालीन मुख्याधिकारी उत्कर्ष गुट्टे यांनी केलेला कारभार आहे. या संदर्भात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे संबंधित तक्रारीची चौकशी व्हावी म्हणून नगर रचनाकार कार्यालय मुंबई मुख्यमंत्री यांनी आदेश देऊन संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करण्यासाठी पाठपुरावा करत असताना सचिन मूळक शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी मात्र आता थेट मुख्यमंत्री यांची भेट घेऊन नीता अंधारे यांची तक्रार करणार असल्याचे सांगितले आहे या तक्रारीमध्ये नीता अंधारे यांनी संबंधित प्रकरणाचा अहवाल बीडचे जिल्हाधिकारी यांना एक महिना झाला तरी अजून दिलाच नाही मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या संबंधित अहवाल पाठविण्यास टाळाटाळ करत आहेत अशी चर्चा यावेळी बीड शहरामध्ये ऐकायला मिळत आहे.

# राज्यात ३१ जुलै सकाळी ११ वाजेपर्यंत १ कोटी ६३ लाख ६० हजार पीकविमा अर्ज दाखल

मुंबई (प्रतिनिधी)

प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत एक रुपयात पीक विमा ही संकल्पना राबविणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य असून, खरीप २०२४ हंगामात ३१ जुलै रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत १ कोटी ६३ लाख ६० हजार पेक्षा अधिक पीकविमा अर्ज दाखल करण्यात आले असून, लाखो शेतकऱ्यांनी एक रुपया विमा सहभाग भरून पिकविमा योजनेत याही वर्षी सहभाग घेतला आहे. आज ३१ जुलै हा विमा भरण्यासाठी अखेरचा दिवस असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांनी आपला विमा तात्काळ भरून घ्यावा व आपले पीक विमा संरक्षित करावे असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. विशेष म्हणजे मागील २४ तासात राज्यभरातून तब्बल ५ लाख ७४ हजार शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचा विमा भरला आहे.

धनंजय मुंडे यांच्यावर शुक्रवारी (ता.२७) मुंबईतील सर एच.एन.रिलायन्स फाऊंडेशन रुग्णालयात पित्ताशयाची शस्त्रक्रिया करण्यात आली असून ते पुढील उपचार घेत आहेत. दरम्यान रुग्णालयातूनही त्यांच्याकडून कृषी विभागाचा आढावा घेणे सुरूच आहे. पीक विम्यासह विविध योजनांचा आढावा ते सातत्याने घेत आहेत.

**शेतकऱ्यांना मोफत वीज**

नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांना ७.५ हॉर्स पावर पर्यंतच्या कृषी वीज पंपांना पूर्णपणे मोफत वीज देण्याचा निर्णय झाला. त्यानंतर काही दिवसातच याबाबतचा शासन निर्णय राज्य सरकारने निर्गमित करून 'मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजने'स आवश्यक निधी उपलब्ध करून दिला. याचा लाभ राज्यातील सुमारे ४४ लाख शेतकऱ्यांना मिळणार असून यासाठी सुमारे १४ हजार ७६० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**कापूस-सोयाबीनला हेक्टरी ५ हजारांचे अनुदान**

त्याचप्रमाणे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी लोकसभा निवडणुकीच्या आधीच सन २०२३-२४ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भाव पडल्याने जे आर्थिक नुकसान सहन करावे लागले, त्या मोबदल्यात कापूस व सोयाबिन उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी ५ हजारांचे अनुदान देण्याची घोषणा केली होती. अर्थसंकल्पीय अधिवेशन पूर्ण होताच या योजनेसाठी सुद्धा सुमारे ४२०० कोटी रुपये अनुदान उपलब्ध करून देण्यात आले असून याचा लाभ राज्यातील सुमारे ८३ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. यात राज्यातील सुमारे ५३ लाख ८३ हजार सोयाबीन उत्पादक (एकूण लाभ - २६१२.४८ कोटी) तर सुमारे २९ लाख ९० हजार कापूस उत्पादक शेतकरी (एकूण लाभ - १५४१ कोटी) याप्रमाणे शेतकऱ्यांना लाभाचे वितरण डीबीटीद्वारे थेट संलग्न बँक खात्यांवर करण्यात येणार आहे. यानिमित्ताने महायुती सरकारच्या माध्यमातून धनंजय मुंडे यांनी दिलेला शब्द पूर्ण करून दाखवला आहे.

**महाराष्ट्रात सर्वाधिक पीकविमा**

खरीप २०२३ मध्ये एक रुपयात पीकविमा ही योजना प्रथमच अंमलात आली होती. त्यानंतर खरिपात राज्यात बहुतांश भागात दुष्काळसदृश परिस्थिती व हवामानातील असमतोल यामुळे झालेल्या नुकसानीच्या पोटी विमा धारक शेतकऱ्यांना आतापर्यंत अग्रीम, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणी पश्चात व



पीक कापणी प्रयोगानंतर असे मिळून आतापर्यंत एकूण ७२८० कोटी रुपये इतका पीकविमा मंजूर करण्यात आला असून यांपैकी ४२७१ कोटी रुपयांची वितरण प्रक्रिया पूर्ण झाली आहे, तर ३००९ कोटी रुपये विमा रक्कम वितरण सुरू आहे. तसेच पीक कापणीचे अंतिम अहवाल निश्चितीनुसार या रक्कमेत आणखी वाढ होणार आहे.

या योजनेच्या माध्यमातून देशात सर्वाधिक पीकविमा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मिळाला आहे. तसेच योजना सुरू झाल्यापासून ही रक्कम आजवरची सर्वाधिक पीकविमा रक्कम असल्याचेही स्पष्ट झाले आहे.





तलवाडा पोलीस ठाण्याचे सिंघम एपीआय सोमनाथ नरके यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभ कार्यालयास सदिच्छा भेट दिल्याबद्दल दैनिक महाराष्ट्र आरंभ च्या वतीने सत्कार करताना संपादक दीपक थोरात उध्दव आरे.

# वास्तववादी साहित्यकार.... लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

अण्णाभाऊंनी फक्त विशिष्ट जातीपुरते लिखाण न करता ,जे जे अन्याय अत्याचाराखाली जीवन जगत आहेत त्यांच्या व्यथा व वेदना आपल्या साहित्यातून जगासमोर मांडल्या. त्यांचे साहित्य म्हणजे वास्तवाचे दर्शन घडवणारे साहित्य होय. त्यांनी सुरुवातीला पोवाडे व शाहिरी तून बहुजनांचे प्रबोधन केले. त्यांच्या साहित्यसंग्रहात ३५ कादंबऱ्या, १४ कथा संग्रह,१४ लोकनाट्य, ११ पोवाडे, नाटक व प्रवास वर्णन यांचा समावेश होतो.

साहित्यातील हिमालयाचे शिखरे पादाक्रांत करणाऱ्या या साहित्यसम्राटाची १०४ वी जयंती साजरी होत आहे. यांचा जन्म एक ऑगस्ट १९२० रोजी वाटेगाव तालुका वाळवा जिल्हा सांगली या खेड्यात उपेक्षित समजल्या जाणाऱ्या मातंग जातीमध्ये झाला. त्यांच्या वडीलाचे नाव भाऊराव व आईचे नाव वालुबाई होते. त्यांचे पाळण्यातले नाव तुकाराम होते. त्यांचे बालपण अतिशय हलाखीत गेले. वडीलाच्या नावावर फक्त वीस गुंठे जमीन होती. यामध्ये दोन महिने पुरेल एवढेच अन्न पिकत असे. त्यामुळे नेहमीच या कुटुंबावर उपासमारीची वेळ येत असे. स्वाभिमानाने व प्रामाणिकपणे जगणाऱ्या अण्णा भाऊंच्या वडिलांना आपले जीवन सुरक्षित वाटेना. त्यामुळे ते मुंबईला निघून गेले. व कुटुंबातील लहान भावंडांना संभाळण्याची जबाबदारी अण्णाभाऊ वरती आली. आणि त्यांचे शाळेकडे दुर्लक्ष झाले. अण्णाभाऊ १४ वर्षाच्या असताना, त्यांनी शाळेत जाणे चालू केले. शाळेचा दुसरा दिवस त्यांचा अखेरचा दिवस होऊन गेला. त्यावेळी जातीयता होती.दलितांच्या मुलांना वाईट वागणूक दिली जात असे. शाळेच्या दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत मास्तराची नजर त्यांच्या पाठीवर गेली नाही. व गेली त्यावेळी त्यांच्या पाठीवरती काहीच लिहिले नव्हते तेव्हा मास्तरांनी त्यांची बोटे फोडून काढली व या गोष्टीचा त्यांच्या मनावर गंभीर परिणाम झाला त्यांनी कधीच शाळेचे तोंड बघितले नाही व अक्षराची ओळख आपल्या भावाकडून करून घेऊ अशा प्रतिकूल अवस्थेतून ही व्यक्ती साहित्यसम्राट म्हणून इतिहासात आपले नाव कायम करून ठेवते .हे एक आश्चर्यच मानावे लागेल .

बाल वयातच लग्न झालेला हा अल्पशिक्षित तरुण पोटापाण्याच्या विवेचनेत मुंबईतला गेला.काही काळ त्यांनी गिरणीत नोकरीही केली .तिथल्या साच्याच्या आवाजात त्यांना लोकसंगीताचा बाज दिसला. साम्यवादाच्या विचाराने उभा राहून त्यांनी ती नोकरी सोडली आणि कम्युनिस्ट पक्षात स्वतः झोकून दिले .चेंबूरच्या चिराग नगर झोपडपट्टी जेमतेम दहा बाय दहा च्या झोपडीत राहणारा आणि जग बदलू पाहणारा हा साहित्यिक कथा कादंबऱ्याचे लेखन करीत होता. हाती होता फक्त आत्मविश्वास आणि सकस अनुभव ओलअसणाऱ्या त्या टिचभर जागेत अण्णा भाऊंनी साहित्याचे विश्व निर्माण केले.त्यांच्या साहित्याची भाषा अस्सल ग्रामीण आहे. त्यांच्या कादंबऱ्यातील नायक अन्यायाविरुद्ध पेटून उठणाराआहे. पुरोगामी विचार घेऊन सभ्य जीवन जगण्यासाठी धडपड करणाराआहे . परंतु प्राप्त परिस्थिती त्याला जीवन जगू देत नाही. म्हणून तो परिस्थितीशी झगडतो. त्याच्या साहित्यात एका बाजूला शुरपणे लढणारा जगण्यासाठी धडपडणारा समाज असतो तर दुसऱ्या बाजूला शोषक अमानवी अत्याचार करणारा, क्रूर व व अमानुष समाज असतो. एकीकडे कष्ट करून पोटाची आग विझवण्याचा प्रयत्न करणारा गरीब माणूस असतो. दुसरीकडे शोषण करून आणलेली पापाची कमाई आपल्या तिजोरीत भरून ठेवणारा दह्या ,दुधाचे ढेकर देऊन पोटावर हात फिरवणारा विषम संस्कृतीचा भक्षक असतो. असल्याकारणाने.त्यांच्या साहित्याचा विषय बहुजन समातील कामगार,मजूर,कष्टकरी,हमाल, भिकारी, गुंड,दरोडेखोर यांच्या जीवनाशी निगडित अस होता. अज्ञान, अंधश्रध्दा,रूढी,परंपरा या मध्ये गुरफटून,दलित वर्ग आपले आयुष्य कसे उध्वस्त करून



ठेवतों हे सारे अण्णाभाऊनी जवळून पाहिले असल्यामुळे त्यांनी त्याचे धग धगते जीवन आपल्या शाहिरीतून जगापुढे मांडले माणूस भुकेसाठी काय करू शकतो हे सांगताना ते म्हणतात

तो भुकेसाठी खोटे बोलु शकतो,तो भुकेकेसाठी चोरी करु शकतो दरोडे घालू शकतो,हे वास्तव अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या कथा आणि कादंबऱ्या मधुन जगापुढे मांडले व जगाला त्याचे वास्तव दर्शन घडविले.पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसुन कष्टकऱ्याच्या, श्रमिकांच्या कामगारांच्या दलितांच्या तळहातावर तरलेली आहे असे अण्णाभाऊ छातीठोकपणे सांगतात व लोकापुठे वास्तव उभे करतात कल्पनारंजित कथा कांदाबऱ्या लिहिण्याचा प्रस्थापित मनुवादी साहित्यकारांनी पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली आहे,असे लिहून बहुजनांना फसविले परंतु अण्णाभाऊंनी बहुजनापुढे वास्तव उभे करून त्यांचे प्रबोधन केले,

बहुजन समाजातील शेतकरी शेतात राबतो कष्ट करतो, मरमर करतो, देशाला खाऊ घालतो, देशाला जगवतो, स्वतः मात्र भाकरीच्या तुकड्यासाठी उपाशी मरतो मोठ-मोठ्या इमारती बहुजन समाजातील मजूर उभा करतो त्या इमारती बांधनारा मंजूर मात्र छता विणा उघड्यावर पडलेला दिसतो. कापड गिरणीमध्ये कामगार कापड तयार करतो स्वतः मात्र कपड्याविना उघडाच राहतो.धोतराला सतरा गाठी बांधुन वावरतो हे वास्तव अण्णाभाऊंनी जीवनाच्या च्या प्रवासात पावलोपावली पाहीले असल्या कारणाने ते म्हणतात

पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसुन ती श्रमिकांच्या,दलितांच्या कष्टकर्यांच्या तळ हतावर तरलेली आहे। हे अर्थात पृथ्वीचा अधार हा दलित कामगार मजूर आहे अण्णाभाऊनी तमाशाला लोकांनाट्यात रूपांतरित करून तमाशाची शान वाढवली त्यांची फकीरा ही कादंबरी जगात गाजली या काबंरीला १९६१ मध्ये महाराष्ट्र सरकारचे पारितोषीक मिळाले होते, ही जग प्रसिध्द कादंबरी अण्णाभाऊनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ज्वलंत व झुंजार लेखणीस अर्पण केली. उपेक्षितांना कामगारांना कष्टकांना न्याय मिळून देण्यासाठी अण्णाभाऊंनी आपल्या साहित्याच्या माध्यमातुन आवाज उठविला व या व्यवस्थेतून मलाबदल घडवून आणावयाचा आहे, असे ते म्हणतात डॉ. बाबासाहेबांचे अपूर राहिलेल काम मला पूर्ण करावयाचे आहे ही तळमळ त्यांच्या ठिकाणी दिसते म्हणून ते म्हणतात

'जग बदल घालूनी घाव,सांगुन गेले मज भीमराव।
एक जुटीच्या रथा वरती आरूढ होऊन चालबा पुढती।
मिळवून स्वातंत्र्य या जगती, कमवी निज गावं,
सांगून गेले मज भीमराव!

अण्णाभाऊचे साहित्य जगाच्या फ्रेंच व रशिया या देशा सहीत २७ देशात भाषांतरित झालेले आहे ऐवढी अपूर्व साहित्य निर्मीती अण्णांनी निर्माण केली होती त्यांच्या शाहिरीने संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ढवळून निधाली आणि डफावरिल थापेने महाराष्ट्र खडबडून जागा झाला आणि सरकारने अण्णाभाऊंना लोकशाहीर पदवीने गौरविले , उपेक्षित समाजात जीवन जगणाऱ्या स्त्री ला अण्णाभाऊंनी खंभीरपने साहित्यात आपली नाईका बनविली आहे. महीलांच्या संघर्षावर प्रकाश टाकणारी आबी नावाची कथा लिहली यातुनच स्त्रियाला कुठल्या व्यथांना सामारे जावे लागते यांचे वास्तव चित्रण साहित्याच्या माध्यमातुन जगापुढे आणले

जनसामान्यांचे प्रबोधन करणाऱ्या साहित्यिकाचे ऐन उमेदीच्या काळात १८ जुलै १९६९ ला निर्वाण झाले अशा अलौकिक व्यक्तिमत्वाच्या उपेक्षित वंचित, श्रमिक, कष्टकरी, शोषित यांच्या व्यथा व वेदना आपल्या साहित्यातून जगासमोर रेखाटणारे दबलेल्या पिचलेल्या समाजाचे दुःख जाणून अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवणारे जगदंविख्यात साहित्यिक साहित्यरत्न, साहित्यसम्राट, लोकशाहीर यांच्या १०४ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन

**श्री.सुभाष लक्ष्मणराव मोरे**



**(सहशिक्षक श्री.विनायकराव माद्यमिक विद्यालय,ता.पाटोदा)**

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे- आंबेडकरी चळवळीच्या दृष्टिकोनातून

## जग बदल घालुनी घाव ! सांगून गेले मला भीमराव!!

या कवणाद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग जग बदलू शकतो असे ठामपणे मांडणारे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे. अशा साहित्य रत्नाचा जन्म वाटेगाव जि. सांगली येथे १ ऑगस्ट १९२० रोजी भाऊ साठे यांच्या कुटुंबात झाला. त्यांचे नाव 'तुकाराम' असे ठेवण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरु संत तुकाराम महाराज यांच्या नावावरून त्यांचे नाव ठेवले गेले.

घरात ते थोरले असल्यामुळे लहान भाऊ आणि बहीण त्यांना अण्णा असे संबोधित असत. वाटेगाव हे औंध संस्थानात होते , तेव्हा दलितांच्या मुलांना वेगळी शाळा होती. शिक्षक सवर्ण असल्यामुळे ते दलित मुलांना दूरवर बसूनच त्यांच्या पाठीवर धडे देत असत. पहिल्या दिवशी गिरवणयासाठी दिलेली काही मुळाक्षरे दुसर्या दिवशी अण्णांनी पाठीवर लिहिलेले नव्हते. म्हणून मास्तरांनी अण्णांना फार मोठी शिक्षा केली. त्या दिवसापासून अण्णांनी शाळेकडे पाठ फिरवली.



मातंग समाजाला त्याकाळी पिढी जात गुन्हेगारी म्हणून संबोधिले असल्यामुळे दारिद्र्य आणि गुन्हेगारी अशा दोन्ही संकटाचा सामना करावा लागला. १९२५ मध्ये गुन्हेगार जमातीच्या वसाहतीचा कायदा संमत झाला व तो मातंग समाजावर लादला गेला. कुठे काही घडले की मातंग समाजाच्या घरांची झाडाझडती घेतली जात असे . जोपर्यंत गुन्हेगार सापडत नाही तोपर्यंत मातंग समाजातील पुरुषांना सळो कि पळो करून सोडत असत .अशा परिस्थितीत अण्णांच्या कुटुंबात माणसांची संख्या अधिक असल्यामुळे उपासमारी ही नित्याचीच बाब होती.

म्हणून वडिल भाऊ साठे यांनी उदरनिर्वाहासाठी मुंबईला जाण्याचे ठरविले .परंतु पैशाच्या अडचणी असल्यामुळे वाटेगाव ते मुंबई हे अंतर पायी चालून गेले. मिळेल ते काम करू लागले. अण्णाभाऊ यांचे चुलत बंधू ज्ञानदेव यांची भेट मुंबईला झाली. ज्ञानदेव पाचवी ते सातवी पर्यंत शिकलेले होते. त्यांच्या घरामध्ये देव देवतांचे फोटो आणि पुस्तके होती. पुस्तकांची ही थप्पी पाहून अण्णा भाऊ थकित झाले.त्यांची तीक्ष्म नजर फोटो व पुस्तके यावर बसली होती. आणि मलाही जमेल का? म्हणून विचारले. आपले बंधू ज्ञानदेव यांच्याकडून अण्णाभाऊ विविध पुस्तकांचे वाचन करून घेत ऐकत. असे एक वर्ष फक्त ऐकले. ऐकून ऐकून आण्णांनी पुस्तके तोंड पाठ केली ज्ञानदेवाच्या संगतीमध्ये अक्षर ओळख झाली ते वाचू लागले एक वर्ष त्यांनी कोणतेही काम केले नाही. वाटेगाव मध्ये ब्राह्मण शिक्षकाने मारल्यामुळे अण्णा भाऊंची शाळा सुटली परंतु मुंबईमध्ये त्यांच्या चुलत भावाकडून त्यांनी वाचनाची आणि लिहिण्याची कला हस्तगत केली.

अण्णाभाऊ साठे यांच्या २६ कथासंग्रहातून सुमारे १३० कथा प्रकाशित झाल्या. संपूर्ण कथा लेखनातून अण्णाभाऊंच्या बंडखोर मनाने घेतलेली अनुकृतीच अनुभव व्यक्त झाले. समाजातील शोषण ,अन्याय, अत्याचार दारिद्र्य ,विषमता ,लाचारी बलात्कार ,अंधश्रद्धा, जातीयता पाहून अण्णाभाऊ अस्वस्थ होते आणि त्यांचे मन पेटून उठत होते . आर्थिक विषमते सोबतच सामाजिक विषमतेचे चित्रणही अण्णाभाऊंच्या कथा मधून पुढे येते. अण्णाभाऊंच्या साहित्यात कल्पनेला वाव नव्हता. प्रत्यक्ष जीवनामध्ये अण्णांनी सोसलं ,अनुभवलं प्रत्यक्ष पाहिलं तेच आपल्या लेखणीतून उभं केलं. अण्णांनी आपल्या लिखानात संयुक्त महाराष्ट्र चळवळ मुंबई महाराष्ट्र ला मिळाली पण बेळगाव हे कर्नाटक मध्ये विलीन करण्यात आले. तेव्हा अण्णाभाऊंनी कवन रचून आपले महाराष्ट्र प्रेम व्यक्त केले. 'माझी मैना गावावर राहिली ,! माझ्या जीवाची होती या काहीली'!!.

अण्णाभाऊ स्वतःच मोठे आहेत त्यांना कोणी मोठे करत नाहीत किंवा अण्णाभाऊ महान आहेत यासाठी कोणाच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. ज्यावेळी त्यांचे वय २८ होते तेव्हाच १९४८ ला पॅरिस येथे भरणाऱ्या जागतिक साहित्य परिषदेचे निमंत्रण अण्णाभाऊंना मिळाले होते. १९६१ मध्ये विंडोसोवियत कल्चर सोसायटीने अण्णाभाऊंना रशियाला बोलविले. दीड दिवस शाळेत जाऊन अफाट असे साहित्य निर्माण केले. वीस कथासंग्रह यामध्ये जवळपास एकशे तीस कथा आहेत. ४० कादंबऱ्या पोवाडे , नाटक , लोकनाट्य लावण्या, प्रवासवर्णन, शाहिरी . सात कादंबऱ्यावर चित्रपट असा लिखाणाचा थक्क करणारा प्रवास आहे.

त्यांच्या बऱ्याच कथा या आंबेडकरवादी आहेत. त्यापैकी एक असणारी 'बुद्धांची शपथ' या कथेमध्ये जातीव्यवस्था आणि प्रस्थापितांच्या विरोधात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले होते त्या धर्मांतराचा प्रभाव गाव खेड्यातील महार जातीवर पडला होता. बौद्ध धर्माने झालेला सकारात्मक बदल सूक्ष्म निरीक्षणाद्वारे अण्णाभाऊ म्हणतात , जग बदल घालूनी गाव सांगून गेले मला भीमराव ! गुलामगिरीच्या या चिखलात रुतून बसला का ऐरावत। अंग झाडून निघ बाहेर घे बिनी वरती घाव।। सांगून गेले मला भीमराव ।।

बुद्धाची शपथ ही कथा लिहून अण्णाभाऊंनी एक प्रकारे 'स्वयंप्रकाशित व्हा' हा मार्ग दाखवला.

भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याचे दृष्टीने कम्युनिस्ट विचारधारा अपुरी आहे याची जाणीव अण्णाभाऊंना झालेली होती. त्यामुळे उत्तर आयुष्यात अण्णाभाऊ आंबेडकरमय अर्थात आंबेडकरवादी झाले होते. अण्णाभाऊ साठे हे पहिले आंबेडकरी कथा लेखक आहेत याची नोंद मराठी वाङ्ममय इतिहासाने न घेणे हा त्यांच्यावरील फार मोठा अन्याय ठरेल . अण्णाभाऊ साठे यांची बहुतांशी साहित्य फुले -शाहू -आंबेडकर यांच्या विचारसरणीला पुढे घेऊन जाणारे आहेत.

अण्णाभाऊ साठे यांची 'फकीरा' कादंबरी डॉ. बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करून अण्णाभाऊ साठे यांनी संघर्ष करा ,लढा द्या हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग दाखवतात .

अशा या महान साहित्यरत्नास त्यांच्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन !

लेख : प्रा. शशिकांत जावळे
९४ २३ ४७ ३२ ०४*

संदर्भ सूची

१) 'अण्णाभाऊ साठे- 'आंबेडकरी चळवळीच्या दृष्टिकोनातून' लेखक- सिद्धार्थ शिनगारे
२) दादाभाऊ अभंग संपादकीय लेख वृत्तरत्न सम्राट पेपर

# वडवणी येथे आरक्षण बचाव यात्रेनिमित्त ॲड.प्रकाश आंबेडकर साधणार संवाद

## आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे:-संतोष बहिरे

वडवणी /प्रतिनिधी

**ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का लागू नये यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर हे आरक्षण बचाव यात्रेनिमित्त दि.१ऑगस्ट २०२४गुरुवार रोजी सकाळी १०:३०वा. छत्रपती शिवाजी महाराज चौक वडवणी येथे येणार असून ते आरक्षण विषयी बहुजन समाजातील समाज बांधवाशी संवाद साधणार आहेत तरी आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाभिक समाजाचे युवा नेते संतोष भैय्या बहिरे यांनी केले आहे.**



गेल्या काही महिन्यांपासून महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यावरून चांगलेच वातावरण तापलेले आहे ओबीसी समाज म्हणतो कोणी आपल्यात घुसखोरी करु नये तर मराठा समाज म्हणतो आम्हाला ओबीसीतुनच आरक्षण द्या या दोन्ही मुद्यामुळे महाराष्ट्रात सामाजिक शितयुध्द पेटल्याचे वातावरण आहे. हे शितयुध्द थांबवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी महाराष्ट्रभर आरक्षण बचाव यात्रेला सुरुवात केली आहे.ही यात्रा दि.१ ऑगस्ट गुरुवार रोजी वडवणी येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात येणार आहेत तरी सर्व आरक्षणधारी बहुजन समाजाने हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाभिक समाजाचे युवा नेते संतोष भैय्या बहिरे यांनी केले आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस साहेब यांनी आज मुंबई येथील सर एच एन रिलायन्स फाउंडेशन च्या हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेले कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. श्री धनंजय मुंडे यांच्यावर मागील शुक्रवारी पित्ताशयाची शस्त्रक्रिया करण्यात आली होती.त्याआधी आज सकाळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तर काल काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांनीही मुंडे यांची भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली होती. मुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनीही दूरध्वनी द्वारे संपर्क करून मुंडेंच्या प्रकृतीची माहिती घेतली.



लिंगायत समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी मन्मथ स्वामी, कपिलधार जि. बीड येथे आरक्षण बचाव यात्रेने भेट दिली यावेळी मंदिर संस्थानाकडून नेते ऍड. प्रकाश आंबेडकर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखाताई ठाकुर, ओबीसी नेते अविनाश भोसीकर, ओबीसी नेते रमेश बारसकर, बसव ब्रिगेडचे किशोर पाटील, सिध्देश्वर ओरादे, सचिन लव्हराले, शिवाजी भालेराव, विकास बिराजदार, अमोल पळसकर, महिला जिल्हाध्यक्ष ऍड. अनिता चक्रे, कल्पना गोरे , पुरुषोत्तम वीर, युनूस शेख, संपादक बालाजी जगतकर, अजय सरवदे, गणेश खेमाडे, एड. राजेंद्र कोरडे, लखन जोगदंड सुशील काकडे, मिलिंद सरपते यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

# परिवर्तनवादी विचारांची नांदी-शाहीर अण्णाभाऊ साठे

**साहित्य हा समाजाचा आरसा असतो समाजामध्ये ज्या बारीकसारीक नाही आणि अन्याय करणाऱ्या घटना घडतात त्याचे सूक्ष्म निरीक्षण करून आपल्या प्रतिभाषाली शब्दांमध्ये लेखक साहित्यात रूपांतरित करत असतो अशा या सर्व साहित्य क्षेत्रामध्ये ज्यांना साहित्यसम्राट ही उपाधी अतिशय योग्य शोभते ते म्हणजे अण्णाभाऊ साठे अण्णाभाऊ साठेचे संपूर्ण नाव हे तुकाराम भाऊराव साठे समाजातील अतिशय शोषित असलेल्या वर्गाचे चित्रण करून त्यांच्या वेदनेला हुंकार होवून साहित्य क्षेत्रामध्ये एक विशिष्ट उंची निर्माण करणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट**

१९२० रोजीसांगलीजिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या गावी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊराव साठे व आईचे नाव वालुबाई साठे होते. साठे हे शाळेत शिकलेले नाही, केवळ दीड दिवस ते शाळेत गेले नंतर तेथील प्रतिगामी सवर्णांद्वारे होणाऱ्या भेदभावामुळे त्यांनी शाळा सोडून दिली. त्यांनी दोन लग्न केलीत, त्यांची पहिली पत्नी कोंडाबाई साठे तर दुसरी जयवंता साठे ह्या होत. त्यांना एकूण तीन अपत्ये होती मधुकर, शांता आणि शकुंतला.फक्त दीड दिवस शाळेमध्ये जाऊन दैदीप्यमान अशी प्रतिभा संपन्न करणाऱ्या अण्णाभाऊ साठेंनी साहित्य क्षेत्रामध्ये जी स्वतःच्या साहित्याची जी उंची निर्माण केली आहे ती उंची आकाशाला गवसणी घालणारी आहे. शाहीर अण्णाभाऊ साठे मार्क्सवाद विचारामुळे ते आणि त्यांचे साहित्य मार्क्सवादी विचाराचा पुरस्कार करणाऱ्या रशियापर्यंत पोहोचले आहेत.शाहीर अण्णाभाऊ साठे हे समाजातील उपेक्षित असलेल्या लोकांच्या वेदनेचा हुंकार म्हणून ओळखले जाणारे एक मराठीतीलसमाजसुधारक,लोककवी आणिलेखकहोते त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते.. आण्णाभाऊ साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते,सुरुवातीला त्यांच्यावर समाजवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलीतांवर होणाऱ्या अत्याचार आणि अन्यायाच्या बाबतीत त्यांनी आपल्या लेखणीतून समाजाचे वास्तव समाजासमोर आणले म्हणून शाहीर अण्णाभाऊ साठे यांना दलित साहित्याचेसंस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. भारत देश स्वतंत्र झाल्या नंतर संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाहीर अण्णा भाऊ साठे यांनी दिलेले योगदान हे अमूल्य आहे.दलित समाजाला प्रेरक तर आहेच पण येणाऱ्या पिढीला मार्गदर्शक आहेत आपल्या लेखणीतून त्यांनी लिहिलेली हे स्फूर्तीदायक असल्यामुळे गावातून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये अनेक युवक युवती जोडल्या गेल्याचे आपल्याला दिसून येते.अण्णाभाऊ साठेंच्या समग्र साहित्याचा अभ्यास केल्यानंतर आपल्या लक्षात ही गोष्ट येते की शाहीर अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनशील विचाराला प्रेरणा देणारे आहे.महाराष्ट्राच्या पुरोगामी भूमीत सत्यशोधक विचारांचे चिंतन करणाऱ्या साहित्याला खतपाणी घालणारे आहे. त्यामुळे आजचा हा पुरोगामी महाराष्ट्र जो झाला आहे त्या पुरोगामी महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये शाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे योगदान अतुलनीय आहे.म्हणजेच महाराष्ट्राच्या एकूणच पुरोगामी जडणघडणीत आणि परिवर्तनाच्या लढ्यात त्यांचे योगदान हे महत्त्वपूर्ण मानले जाते. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही केवळ राजकीय न राहता ती सर्वसामान्यांमध्ये रुजली पाहिजे या दृष्टिकोना तून कलावंत साहित्यिक कवी असणारे शाहीर अमर शेख आणि शाहीर द.न. गव्हाणकर यांनी केले. महाराष्ट्र हा संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे या दृष्टिकोनातून सर्वसामान्यांमध्ये आणि त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन होण्याच्या दृष्टिकोनातून शाहीर अमर शेख शाहीर दना गव्हाणकर शाहीर अण्णाभाऊ साठे आशा मातब्बर शहरांनी मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमाभागातील अनेक ठिकाणी शाहिरांनी आपल्या लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले.शाहीर अण्णाभाऊ साठेंच्या विचारावर भारत

रत्नडॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा विशेष प्रभाव होता म्हणून ते दलित कार्याकडे वळले आणि दलित व कामगारांच्या जीवनातील अनुभवांना प्रकट करण्यासाठी त्यांच्या कथांचा वापर केला.इ.स. १९५८ मध्ये, मुंबई मध्ये स्थापन केलेल्या पहिल्यादलित साहित्य संमेलनात खुळचट कल्पनांच्या नांग्या ठेचुन काढण्यासाठी आपल्या उद्घाटनपर भाषणात ते म्हणले की, पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर तरलेली आहे . या त्यांच्या परखड विचारांमधून समाज हा रचनात्मक आणि समान पातळीवर असला पाहिजे हे स्पष्टपणे दिसते.काल्पनिक दंतकथांवर समाजाची रचना होऊ शकत नाही आणि जर झाली तर ती अन्यायकारक असू शकते हा ही विश्वास आपल्याला त्यांच्या साहित्यातून त्यांच्या विचारातून दिसतो. आपल्या साहित्यातून आणि व्यासपीठावरून ते वारंवार म्हणत असे की दलित लेखकांना सध्याच्या सांसारिक वहिंदूअत्याचारांपासून दलितांना मुक्त करणे आणि त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी आपल्यै देण्यात आली आहे.कारण दीर्घ कालीन पारंपरिक श्रद्धांना त्वरित नष्ट केले जाऊ शकत नाही. इतका बहु आयामी आणि अभ्यासात्मक विचार त्यांचा होता. अतिशय भुरसटलेल्या विचारांनी ढासळत चाललेल्या समाजाकडे पहात त्यांनी पुढील पुस्तकांची निर्मिती केली आहे अकलेची गोष्ट लोकनाटच,अमृत, आघात,आबी,आवडी,इनामदार ,कापऱ्या चोर,कृष्णा काठच्या कथा,खुळंवाडा,गजाआड,गुऱ्हाळ,गुलाम, चंदन,चिखलातील कमळ,चित्रा ,चिरानगरची भुतं, नवती,निखारा,जिवंत काडतूस,तारा,देशभक्त घोटाळे, पाझर (कादंबरी),पिसाळलेला माणूस,पुढारी मिळाला, पेंग्याचं लगीन,फकिरा , फरारी ,मथुरा माकडीचा माळ , रत्ना ,रानगंगा,रूपा,बरबाद्या, कंजारी,बेकायदेशीर,माझी मुंबई,मूक मिरवणूक,रानबोका,लोकमंत्र्यांचा दौरा ,वारणेचा वाघ ,वैजयंता,वैर,शेटजींचे इलेक्शन ,संघर्ष,सुगंधा,सुलतान साहित्यरत्न शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या मार्मिक



अशा साहित्य वर आधारित अनेक चित्रपटे निघाले ते पुढील प्रमाणे वैजयंता , टिळा लावते मी रक्ताचा,डोंगरची मैना, मुरली मल्हारीरायाची ,वारणेचा वाघ,अशी ही साताऱ्याची तऱ्हा,फकिरा .आसा हा शाहीर महाराष्ट्राने परिधान केलेलेल्या राजमुकुटाच्या कोंदनात मडवलेला.. डॉ.बाबासाहेब आंबेडकरी विचाराचा हिरा आहे. म्हणून दोन ओळी भाऊंसाठी उघड्या डोळ्यांनी पाहिलेले दलितांचे दुःख- वेदन ऐरणीवर आणुन प्रतिघात केला.. माझ्या भिमरायाचा विचार साहित्यातुन लिहित अवघा समाज बंडखोर केला.

निवेदक सुरेश साळुंके
७०२०५५५०६५

# दत्ता विसवळे यांनी माजलगाव विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरावे

## ही सामान्य जनतेची इच्छा !

माजलगाव /प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील धडाडीचे ओबीसी नेता म्हणून ओळख असलेले दत्ता विसवळे यांची माजलगाव मतदार संघात सध्या विधानसभेसाठी जोरदार चर्चा चालू असून येत्या काळात ते आमदार दिसतील असे सर्वसामान्य नागरिकांतून बोलले जात आहे व प्रस्थापितासाठी नव्हे तर लोकशाहीत सर्वांना मुभा असते. याचे भान प्रस्थापितांना राहिले नाही. राजकीय मक्तेदारी मोडीत काढावी लागेल गेल्या लोकसभेत निवडणुकीत संधी हुकली ती आता हुकु द्यायची नाही. संधी दार ठोठावत असते हे सत्य असले तरी आज स्पर्धेच्या युगात तर दार तोडून संधी मिळवावी लागते. प्रसंगी घुसखोरावर मात करून गरुड भरारी घ्यावी लागते. माजलगाव मतदार संघाचा पल्ला गाठण्यासाठी दत्ता विसवळे यांची पुरेपूर तयारी झाली आहे. हट्ट करणं वाईट असतं पण कांही वेळी कांही हट्ट गुणकारी ठरतात. राजकीय दिशा ओळखून दूर दृष्टीने निर्णय घेऊन सकारात्मक पाऊल उचलण्याच्या निष्ठांतपणा त्यांच्या व्यक्तिमत्वात आहे. लोकांना गृहीत धरून एकाधिकारशाहीच राजकारण करणाऱ्यांना शह देत लोकांच्या मनातले प्रश्न ओळखुन लोक भावना हाताळून निर्णय घेत लक्ष गाठण्यासाठी वाटचाल चालू आहे. निस्वार्थ भावनेतून कर्तव्य निभावत जन प्रेम उभा केल आहे. जनसेवा आणि थेट संपर्क ही अत्यंत साधी रणनिती ठेवून कायम जनतेची नाळ जोडली आहे.समस्या निर्मूलनासाठी यश अपयशाची परवा न करता लोकशाही मार्गाने संघर्ष चालू आहे. समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून केलेली सेवा वेळोवेळी साधलेला संवाद व संपर्क यामुळे निर्माण झालेली लोकशक्ती प्रचलित प्रस्थापितांना गारद करण्यासाठी माजलगाव सज्ज आहे. राजकीय मक्तेदारी व दहशतीखाली



दबलेला काही मतदार वर्ग खुल्या मनाने बोलत नसला तरी निवडणुकीच्या रणधूमाळीत भय मुक्तीसाठी दत्ता विसावळे यांना बिनधास्त मतदान करेल. आज. घडीची राजकीय परिस्थिती लक्षात घेता दता विसावळे यांच्या जिद्दीला माजलगाव यांची साथ निश्चित लाभू शकते. हे मात्र खरे आहे

# पदोन्नतीसाठी आमरण उपोषण संघर्षमय अपरिहार्तता - अनिल जाधवर

बीड ।प्रतिनिधी

निकष व अटींची पुर्तता करणाऱ्या कर्मचार्यांना प्रशासकिय विभागातुन पदोन्नती देण्यात यावी यासाठी उपोषण करण्यात आले संघर्ष करण्याची तयारी ठेवावी असे आवाहन शिक्षक संघटनेचे अनिल जाधवर यांनी केले. शिक्षण विभागातील केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक ग्रेड (प्रा) ही पदे पदोन्नतीने भरावीत. तीन वर्षापासून प्रलंबित असणारे निवडश्रेणी व चटोपाध्याय आदेश मंजूर करावेत. वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके सहा महिन्यापासुन प्रलंबित होती ती समितीने मंजूर करावीत या प्रमुख मागण्यासाठी शिक्षक पदोन्नती संघर्ष समन्वय समिती कडून दि. २४ जुलै रोजी जिल्हा परिषदेसमोर आमरण उपोषण पार पडले. उपोषणा दिवशी सायंकाळी प्रशासनाकडून कांही मागण्या / प्रश्न पंधरा ऑगस्ट पूर्वी सोडवले जातील असे सांगितले व कालबद्ध वेळापत्रक लिखित स्वरुपात पदोन्नती संघर्ष समितीच्या नावे देण्यांत आले. त्यामध्ये प्रामुख्याने गणित/ विज्ञान विषयाची पदवीधरची पदे भरणे, मुख्याध्यापक पदाच्या पदोन्नती करणे, प्रलंबित वैद्यकीय संचिकांना मान्यता देणे या विषयी सोडवण्यासाठी / मंजूर करण्यासाठी शिक्षण विभागाने कार्यवाही सुरु केली. परंतु हे प्रश्न सोडवण्यासाठी विलंब करण्याचे कुठलेही कारण नव्हते . शिक्षण विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या दुर्लेक्षित पणामुळे विलंब झाला हे निश्चित पणे म्हणता येईल.

उपोषणाची मुख्य बाब केंद्रप्रमुख व विस्तार अधिकारी शिक्षण ह्यांच्या पदोन्नती होय. केंद्रप्रमुख पदोन्नती करण्याबाबत सर्वोच्च न्यायालय खंडपठ औरंगाबाद( संभाजीनगर ) यांनी न्यायालयीन अवमान याचिकेच्या आधारेआदेशित केले होते. दि. ६ फेब्रुवारी ते १५ जुलै पुर्वी केंद्रप्रमुख पदोन्नती करून आदेश निगमित केले जातील असे शपथपत्र जिल्हा परिषदकडून न्यायालयात दाखल केले होते. सदरिल कालावधीत जिल्हा परिषदेकडून केंद्रप्रमुख पदोन्नती करण्यात आल्या नाहीत. न्यायालयीन निर्णयाचा देखील अवमान करण्यात आला . या दरम्यान जून व जुलै महिन्यामध्ये निवृत्त होणाऱ्या शिक्षक व कर्मचार्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते हे ही प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले तरीसुद्धा प्रशासनाने विहित वेळेत केंद्रप्रमुख पदोनत्या केल्या नाहीत. अनेक शिक्षक पदोन्नती विना जून अखेर सेवानिवृत्त झाले. पदोन्नती पासुन वंचित राहिले. यास जबाबदार कोण या सर्व बाबींची



अपरिहार्यता म्हणजे जिल्हा परिषदेसमोर शिक्षक पदोन्नती संघर्ष समितीचे आमरण उपोषण होय. आता तरी शिक्षण विभागाने १५ ऑगस्ट पुर्वी मुख्याध्यापक पदोन्नती, गणित विज्ञान पदवीधर पदे भरणे. निवडश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करणे . प्रलंबित वैद्यकीय प्रस्ताव मंजूर करणे हे सर्व प्रश्न वेळेत सोडवावेत तसेच न्यायालयाच्य अधिन राहून केंद्रप्रमुख पदोन्नती कराव्यात. अन्यथा १५ ऑगस्ट २०२४ नंतर शिक्षकांच्या प्रश्नासाठी व पदोन्नतीसाठी आमरण उपोषण अपरिहार्य असे शिक्षक पदोन्नती संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाला इशारा दिलेला आहे. यावेळी कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ, कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, महाराट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, महाराष्ट्र शिक्षक संघटना, तसेच जिल्हयातील शेकडो शिक्षकसह अनिल जाधवर, राजेंद्र खेडकर, नामदेव शिंदे, प्रकाश अहिरे, सुरेश पवार, चंद्रकांत साबळे, भागवत डाके, भगवान पवार, मनियार फारुक सह आदी उपस्थित होते.

चौकट ?पदोन्नती केल्यामुळे पात्र पदोन्नती धारकांना न्याय मिळेल .गणित व विज्ञान विषय शिकवण्यासाठी विज्ञान विषयाचे पदवीधर शिक्षक उपलब्ध होतील चटोपाध्याय, निवड श्रेणी प्रस्ताव मंजुरीमुळे शिक्षकांचा प्रशासनावरील असंतोष कमी होईल अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईल आंतर जिल्हा बदलीने बीड जिल्ह्यात बदलून आलेले ५६ शिक्षक चार महिन्यापासुन नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत, त्यांना नियुक्ती मिळेल व विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी गरज असणाऱ्या शाळेत शिक्षक उपलब्ध होतील मा. पालकमंत्री तसेच सन्माननीय आमदार महोदयांनी हे प्रश्न सोडवण्यासाठी तात्काळ या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज .अनिल जाधवर

राज्य अध्यक् कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ महाराष्ट्र राज्य .

# युवासेना मराठवाडा निरीक्षक पदी अविनाश जाधव यांची निवड

शिवसेनेचे मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री श्री.एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या हस्ते व युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक,युवासेना सचिव राहुल लोंढे, मराठावाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या उपस्थिती मध्ये युवासेना मराठवाडा निरीक्षक पदी अविनाश जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक व बाजीराव दादा चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हासह संपुर्ण मराठवाड्यातील प्रत्येक युवकांपर्यत युवासेनेचे कार्य



पोहचवत असताना.आज बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली अविनाश जाधव यांनी केलेल्या कामाची दखल घेत.शिवसेना मुख्य नेते व महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री श्री.एकनाथरावजी शिंदे साहेबांनी, युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक, युवासेना सचिव राहुलजी लोंढे,मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या उपस्थिती मध्ये अविनाश जाधव यांची युवासेनेच्या मराठवाडा निरीक्षक पदी नियुक्ती पत्र देऊन निवड केली.यावेळी युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेशजी सरनाईक, सचिव राहुल लोंढे मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांनी अविनाश जाधव यांना युवासेना मराठवाडा निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# गायरान सातबारा नावाने करा, अन्यथा करचुंडीत मतदानावर बहिष्कार - जयसिंग वीर

## बीड जिल्हा प्रशासनाचे आंदोलनाकडे दुर्लक्ष

बीड ।प्रतिनिधी

करचुंडी येथील दीडशे च्या वर गावकरी गेल्या १९६५ पासून गायरान जमीन कसत आहेत. गायरान ज़मीन कसत असलेल्या शेतकऱ्यांच्या नावाने सातबारा उतारा नोंद करावी अन्यथा इथून पुढे मतदानावर बहिष्कार टाकण्याची घोषणा आंदोलनाच्या बाराव्या दिवशी जयसिंग सुखदेव वीर यांनी केली आहे.

अनेक वर्षापासून हे गावकरी आपली उपजीविका या कारण जमिनीवर शेती करुन भागवत आहेत. त्यांनी प्रशासनाकडे तीव्र स्वरूपात लढा सुरू केला असून अद्याप प्रशासनाकडून या




आंदोलनाची दखल घेण्यात आलेली नाही. या जमिनीवर अन्नधान्य पिकून हे लोक आपल्या कुटुंबाची उपजीविका भागवत आहेत. इतरही शासनाच्या योजना उचलण्यासाठी नावावर सातबारा असणे आवश्यक आहे. त्यासाठी हे बेमुदत गायरान धारकांचे उपोषण सुरू आहे. या आंदोलनाची दखल दखल घ्यावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. विविध सामाजिक संघटनांनी आतापर्यंत या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. जोपर्यंत सक्षम अधिकाऱ्याकडून गायरान धारकांना लिखित स्वरूपात आश्वासन मिळत नाही तोपर्यंत हे आंदोलन चालत राहणार अशी माहिती जयसिंग सुखदेव वीर यांनी एका पत्रकाद्वारे दिली आहे.

# रामेश्वर गावातील शेतकऱ्याचा मुलगा झाला एमबीबीएस डॉक्टर..!!

बीड ।प्रतिनिधी

ग्रामीण भागात मध्ये एक शिक्षण क्षेत्रात बघण्याचा दृष्टिकोन हा वेगळा आहे.कारण असं म्हटलं जातं की ग्रामीण भागातील मुल यशस्वी होण्याची टक्के वारी फार कमी आहे.परंतु ह्या सगळ्या गोष्टींना पुसण्याचं काम ग्रामीण भागातील होतकरू मुलं करतात. कारण रामेश्वर ता.गेवराई जि.बीड या एका छोट्या गावातील मुलगा जयराम छगनराव जगदाळे हा मुलगा डॉक्टर झाला आहे आणि आनंद पंचक्रोशीतील सामान्य लोकांना झालेला आहे.कारण जयराम हा एका सामान्य कुटुंबात जन्मलेला मुलगा आहे.




आई वडील हे शेतकरी आहेत. परंतु जयराम हा स्वतः शी प्रामाणिक राहून शिक्षण प्राथमिक शिक्षण हे गावातील जिल्हा परिषद शाळेत घेऊन व महाविद्यालयीन म्हणजेच अकरावी व बारावी शिक्षण तलवडा या गेवराई तालुक्यातील गावांमध्ये झाले.परंतु शिक्षण जरी ग्रामीण भागात झाले असले तरी स्वप्न मात्र मोठे होते कारण त्यांच्या मागे प्रेरणा, आदर्श व कष्ट हे मात्र त्यांच्या आई वडिलांचा आहे. हे मात्र जयराम कधीही विसरला नाही. म्हणून जयराम छगनराव जगदाळे हा मुलगा एमबीबीएस डॉक्टर झाला आणि जयराम मुळे ग्रामीण भागातील मुल यांना देखील विश्वास आला की ग्रामीण भागातील मुल देखील शिक्षण क्षेत्रात कुठेही कमी नाहीत. यानंतर देखील या भागातील मुल हे जयराम चा आदर्श घेऊन शिक्षण क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली यात काही शंका नाही. जयराम छगनराव जगदाळे या पुढील सेवेसाठी शुभेच्छा.

# आरक्षण बचाव यात्रेच्या महासभेस एस्सी एसटी ओबीसीने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे- इंजि.विष्णु दादा देवकते

बीड ।अंकुश गवळी

गेली अनेक वर्ष सातत्याने ओबीसींच्या आरक्षणाचा लढा अँड बाळासाहेब आंबेडकर हे लढत आहेत एस्सी एसटी ओबीसीचे आरक्षण कायम रहावे व मराठ्यांसाठी आरक्षणाचे वेगळे ताठ असावे हि कायम भुमिका अँड बाळासाहेब आंबेडकर मांडत आहेत गेली कित्येक वर्षांपासून आपली राजकीय पोळी साधण्यासाठी सत्ताधारी व विरोधक ओबीसी व मराठा बांधवांमध्ये दिशाभूल करण्याचे काम करत आहेत त्यामुळे मराठा ओबीसी संघर्ष टोकाला गेला आणि अशातच महाराष्ट्र पेटवू नये म्हणून कायम सातत्याने भुमिका घेत आहेत म्हणून एस्सी एसटी ओबीसी व मराठा बांधवांमध्ये जनजागृती होण्यासाठी अँड बाळासाहेब आंबेडकर यांनी एस्सी एसटी ओबीसी आरक्षण बचाव यात्रा महाराष्ट्रातुन सुरू केली आहे यात्रे निमित्त अँड बाळासाहेब आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थिती मध्येओबीसी आरक्षण बचावमहासभेचे आयोजन गेवराई शहरात ३१जुलै रोजी सायंकाळी ४०० वाजता करण्यात आले या सभेला संघर्षयोद्धा प्रा, लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे, प्रदेश आध्यक्षा रेखाताई ठाकुर, प्रदेश उपाध्यक्ष किसने चव्हाण,प्रा,विष्णु जाधव,ओबीसी नेते सोमनाथ सौळुंके, अविनाश भोसीकर,आशोक हिंगे,प्रा बारस्कर



यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे या ऐतिहासिक महासभेस गेवराई विधानसभा मतदारसंघातील एस्सी एसटी ओबीसी यानी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे नेते तथा संघर्ष यात्रा समितीचे स्वगताध्यक्ष ईजि.विष्णु दादा देवकते यांनी केले आहे

# डॉ.सोनाली जाधव यांना राहिले नाही वेळेचे भान

## अकरा वाजल्या तरीही डॉ.सोनाली जाधव यांची खुर्ची रिकामीच ?

नाळवंडी / प्रतिनिधी

नाळवंडीच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्ण कोमात आणि वैद्यकीय अधिकारी डॉ.सोनाली जाधव मात्र जोमात.बीड शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेले नाळवंडी सारखे मोठे गाव या गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय आधीकारी डॉ.सोनाली जाधव यांचा मनमानी कारभार कित्येकदा समोर पाहायला मिळालेला आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ सोनाली जाधव यांना वेळेच्या बाबतीत वारंवार तोंडी सांगून ही परत तीच बोंब मारावी लागत आहे,प्राथमिक आरोग्य केंद्रातील चार्जशीट मुख्याधिकारी डॉ.सय्यद यांना लॉलीपॉप देऊन गप्प केले की काय असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होताना दिसत आहे,डॉ.सय्यद यांनी कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या अधिकाऱ्यांना नियमावली दिली नाही का ? अतिशय वाईट अवस्था रुग्णालयाची होत आहे,जवळपास दररोज १०० ते १५० ओपिडी या रुग्णालयातून निघत असते.मात्र डॉ.सोनाली जाधव यांच्या ड्युटी मध्ये चक्क रुग्णांना त्यांची देवासारखी वाट बघावी लागत आहे, डॉ.सोनाली जाधव यांच्या हालगर्जी पणा मुळे रुग्णांचे जीव



धोक्यात जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.रुग्णांचे जर काही बरे वाईट झाले तर याला जबाबदार कोण ?अधिकाऱ्यांची ड्युटी सकाळी ९ वाजता असते,मात्र सगळे नियम मोडून बेजबाबदार आधिकारी डॉ.सोनाली जाधव या चक्क ११ वाजता रुग्णालयात येतात,मंग गोर गरीब जनतेने,कष्टकरी जनतेने या रुग्णालयात यावे की नाही असा प्रश्न या ठिकाणी निर्माण होत आहे.या अधिकाऱ्यांना कंटाळून रुग्णांकडून संताप व्यक्त होताना दिसत आहेत.प्राथमिक आरोग्य केंद्रातील चार्जशीट,मुख्य अधिकारी, डॉ.सय्यद यांचं कुणीही आईकायला तयार नाही,खेडे गावची लोक शेतात जाण्यासाठी धरपड करत असतात.मात्र डॉक्टरांची वाट बघत दुपारपर्यंत रुग्णांनी बसायचं का ? डॉ.सोनाली सारख्या अधिकाऱ्यांना बेशिस्तीचा आजार लागलेला कधी दूर होईल,अश्या या बेजबाबदार अधिकाऱ्यांना जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ हे धडा शिकवतील का ?जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडून या रुग्णांना न्याय मिळेल का? या बेशिस्तीची लागण असलेल्या अधिकाऱ्यांना लवकर धडा शिकवा अशी मागणी गावकऱ्यांच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ यांना करण्यात येत आहे.अन्यथा पुढे होणाऱ्या प्रसंगाला सामोरे जावा लागेल.

## पीएमपी बसच्या धडकेत महेश नरवडे व सागर कदम या दोन तरूण मित्रांचा
# जागीच मृत्यू



गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : भरधाव पीएमपी बसने धडक दिल्याने दुचाकीवरील दोघा तरूण मित्रांचा मृत्यू झाला आहे. ही घटना पिंपरी-चिंचवड येथील रेल्वे पुलावर घडली आहे. महेश भाऊसाहेब नरवडे (वय- २०, डांगेचौक, थेरगाव) व सागर अरुण कदम (वय १९, रा.डांगेचौक, थेरगाव) अशी अपघातात मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. महेश नरवडे हा मुळ बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील देवपिंपरी येथील रहिवासी आहे. अनेक वर्षांपासून ते पिंपरी-चिंचवड येथे स्थानांतर होता. याप्रकरणी सुधाकर भाऊसाहेब नरवडे (रा. थेरगाव) यांनी पिंपरी-चिंचवड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार बसचालक संभाजी शंकर राशीनकर (वय ३३, रा. भीमा कोरेगाव, ता. शिरूर) याला पोलिसांनी अटक केली आहे.

फिर्यादी यांचे भाऊ महेश व त्यांचा मित्र सागर हे दोघेजण शनिवारी (दि. २९) रात्री पिंपरी चिंचवडगावातील चापेकर चौकाकडून चिंचवड स्टेशनकडे येत होते. दरम्यान, चिंचवड रेल्वे पूल येथे त्यांच्या दुचाकीला पीएमपीच्या भरधाव बसने धडक दिली. या अपघातात सागर आणि महेश या दोघांना गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. तसेच दुचाकीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

# क्षीरसागरांच्या कर्तुत्वामुळे बीडकरांना प्यायला पाणी नाही..!

### उड्डाणपूल व स्लीप रोड कामाच्या श्रेयासाठी क्षीरसागरांनी रिकामी लुडबुड करू नये - राजेंद्र मस्के

बीड /प्रतिनिधी

बीडकरांना गेली पंचवीस वर्षापासून पंधरा दिवसाला एकदा प्यायला पाणी मोठ्या मुश्किलीने मिळते. कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च झाला. तीस वर्ष सत्ता भोगूनही आज बीड करांचा पाण्याचा प्रश्न मिटला नाही. बीड शहराची बकाल अवस्था करण्याचे श्रेय सर्व क्षीरसागरांना जाते. निवडणुका डोळ्यासमोर पाहून, पुन्हा एकदा विकासाच्या नावाखाली क्षीरसागरांनी सुरु केलेली लुडबुड निष्फळ ठरेल. नागरिकांचे मुलभूत प्रश्न सोडवण्या ऐवजी उड्डाणपूल व स्लीप रोड कामाचे श्रेय घेण्यासाठी लुडबुड करू नये. असा सल्ला भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष क्षीरसागरांना दिला आहे.

भाजपा राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, आ. नमिताताई मुदंडा, आ. लक्ष्मण पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, रमेशराव आडसकर, अक्षय मुंदडा



यांच्या शिष्ट मंडळाने भूपृष्ठ वाहतूक मंत्री ना. नितीन गडकरी यांची दिल्ली येथे दि. २०/१०/२०२१ रोजी भेट घेऊन बीड जिल्हातील नागरिकांच्या सोयीसाठी रस्ते आणि पुलांचे प्रश्न मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. छत्रपती संभाजीनगर ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बीड शहरालगत स्लीप रोड, बाह्य वळण रस्त्यावर उड्डाण पूल, बिंदुसरा नदीवर पूलकम बंधारा, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी अशा विविध कामांना प्राधान्य देऊन, रस्ते विकासाची कामे मार्गी लावावेत अशी मागणी केली होती. ना. गडकरी यांनी त्यावेळी तात्काळ दखल घेऊन, रस्ते विकासाचे काम हाती घेतले होते. त्या निर्देशानुसार आज कार्यवाही सुरु असून, केवळ पंकजाताई मुंडे व प्रितमताई मुंडे यांच्या प्रयत्नातून विकास कामांना गती मिळाली आहे. परंतु जसजशी विधानसभा जवळ येत आहे. क्षीरसागर कुटुंबीयांची स्वार्थी धडपड सुरू झाली. कोणी अधिकाऱ्यांच्या भेटी घेऊन फोटो काढणे तर कोणी लोकसभा प्रचारादरम्यान आलेल्या ना. गडकरी साहेबांना निवेदन देऊन, काढलेले फोटो व्हायरल करण्याची नौटंकी करत आहेत. श्रेय लाटण्याचा निष्फळ प्रयत्न करत आहेत. हाती सत्ता असताना कर्तव्याची जाण ठेवून, विकासाला प्राधान्य दिले नाही. जनतेला वाऱ्यावर सोडून सत्तेतून संपत्ती आणि संपत्तीतून सत्ता मिळवण्याचा उग्योग केला. सुजान मतदारांना क्षीरसागरांचा लबाडीचा खेळ लक्षात आला आहे. भविष्यात श्रेय लाटण्याचा रिकामा उद्योग करू नये असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

# श्रीक्षेत्र अरण चा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास - कल्याणराव आखाडे

प्रतिनिधी) श्रीक्षेत्र अरण विकासाच्या प्रश्नाला वाचा फोडण्याचे काम सावता परिषदेने केले ही बाब कोणीच नाकारू शकत नाही.शेवटच्या श्वासापर्यंत श्रीक्षेत्र अरण विकासाची लढाई लढत राहणार.श्रीक्षेत्र अरणचा विकास हाच सावता परिषदेचा ध्यास असल्याचा निर्धार कल्याणराव आखाडे यांनी व्यक्त केला.

टाका ता. अंबड जि.जालना येथे संतशिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीसोहळा निमित्ताने पारंपरिक अखंड हरिनाम सप्ताह प्रारंभी विणा पूजनासाठी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांना निमंत्रित करण्यात आले होते.प्रसंगी बोलतांना कल्याणराव आखाडे म्हणाले की,सावता परिषदेची स्थापना माळी समाजाच्या हिता-अस्मितेच्या प्रश्नांचा जागर करण्यासाठी झाली आहे.श्रीक्षेत्र अरण प्रश्नाला पहिल्यांदा सावता परिषदेने वाचा फोडली आहे.सावता परिषदेच्या माध्यमातून अनेक श्रीक्षेत्र अरण येथे सरकारला यावे लागले.सरकार पक्षातील अनेक मंत्री पहिल्यांदाच अरण याठिकाणी सावता परिषदेमुळे आले त्यातून अनेक विकास कामे मार्गी लागली. सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सावता परिषदेने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित दादा पवार यांना निवेदन दिले आहे.भविष्यातही श्रीक्षेत्र अरण चा लढा सावता परिषद अविरतपणे सुरू ठेवणार आहे.यावेळी ह.भ.प. राधाकृष्ण जायकर, सावता परिषदेचे प्रदेश प्रवक्ते डॉ राजीव काळे यांची उपस्थिती होती.मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.





# ‘गजानन’ च्या तिसर्या गाळप हंगामाचे रोलर पूजन

## मुख्यमंत्री ना.शिंदे साहेब,आपणास शिक्षक व शिक्षण लाडके नाही काय ?

# प्रा.ईश्वर मुंडे यांचा मुख्यमंत्र्यांना सवाल

किल्ले धारूर ( रोहित फावडे)

लोकसभेला मतदारांनी आसमान दाखवल्यावर आता महाराष्ट्रात विधान सभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून कोणाची मागणी नसतांना ही विद्यमान सरकार मतदारांना भुलवण्यासाठी रोज एक नवीन योजना घोषीत करत आहे.

आता लाडकी बहीन,लाडका भाऊ, लाडके वारकरी,अन्नपुर्णा अशा योजनांचा पूर येत आहे. या योजनांच्या जाहीरातीसाठी शेकडो करोडोंचा चुराडा व शासकीय कर्मचारी यांचा वापर केला जात आहे.

परंतू शिक्षण,आरोग्य या नागरिकांच्या मुलभूत अधिकारांकडे दूर्लक्ष केले जात आहे.महाराष्ट्रात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणारे हजारो शिक्षक अनेक वर्षे वेतना पासून वंचित आहेत.ज्यांना वेतन आहे ते टप्पा वाढीच्या खिंडीत अडकून तुटपुंज्या वेतनावर काम करत आहेत.अनेक शाळेत शिक्षक व शिक्षकेतर पदे रिक्त आहेत त्यांची भरती बंद आहे. या सर्व प्रश्नांकडे दूर्लक्ष करणाऱ्या मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांना आपणास शिक्षण व शिक्षक लाडके नाहीत काय ? असा सवाल प्रा.ईश्वर मुंडे,राज्य प्रमुख,सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल,राष्ट्रवादी कॉंग्रेस-शरदचंद्र पवार पक्ष यांनी केला आहे.

या सरकारला विद्यार्थी लाडके नाहीत काय? असा सवाल ही मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी शिक्षक रिक्त पदे भरती याचीकेच्या सुनावणी दरम्यान विचारला होता.

बीड येथे विविध शैक्षणिक मागण्यांसाठी विविध शिक्षक व ईतर संघटनाचे चक्री आंदोलन सुरू आहे या आंदोलनास भेट देवून प्रा.ईश्वर मुंडे बोलत होते.या वेळी शिक्षक संघटनेचे डी.जी.तांदळे,राजेश्वर कदम,दत्तात्रय चव्हाण,दिपक वडमारे,आत्माराम वाव्हळ,सतीश सोनवणे,अविनाश काजळे,गणेश गुजर,संभाजी इंगोले,हनुमान बडे,वशिष्ठ शिंदे,सचिन यादव,बाबाराम थोरात,तानाजी मोरे,नरेंद्र गंदगे,सचिन खुरणे तसेच अंशत: अनुदानीत,विना अनुदानीत शिक्षक - शिक्षिका बहू संख्येने उपस्थीत होते.

## लोकशाहीर आणाभाऊ साठे

शेतकऱ्यांचे व कष्टकऱ्यांचे भाऊ होते नाथ,
म्हणून समाजाने त्यांना दिली साथ!

आण्णाभाऊंच्या वाटेत खुप आले होते काटे,
संघर्षतुन वाट काढणारे होते आण्णाभाऊ साठे!!

आण्णाभाऊ साठे फक्त दिडच दिवस शाळेत गेले ,
तरीही त्यांनी महाराष्ट्राला कथा, कादंबऱ्या, पोवाडे रेखाटून दिले!!

आण्णाभाऊ साठे यांचे डॉ . बाबासाहेब आंबेडकर होते गुरू,
त्यामुळे आण्णाभाऊंचे जीवन चांगले होते सुरू!!

संपूर्ण महाराष्ट्र मंत्रमुग्ध झाला वाचून फकिराला,
म्हणूनच कोटी कोटी प्रणाम त्या लोक शाहीराला!!

**कपिल आवाड**
**मो.७४४७४९३६७४**

**बीड (प्रतिनिधी):- शेतकरी बांधवांची, सहकाराच्या माध्यमातून समृध्दी व्हावी या उद्देशाने अनेक अडचणींतून मार्ग काढत गजानन साखर सुरू केला आहे. तालुक्यासह आजुबाजूच्या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हक्काचा कारखाना उपलब्ध झाला आहे. असे प्रतिपादन आ.संदीप क्षीरसागर यांनी गजानन साखर कारखान्याच्या गाळप हंगामाच्या रोलर पूजनाच्या कार्यक्रमात केले.**

### सहकाराच्या माध्यमातून समृध्दी व्हावी- आ.संदीप क्षीरसागर

गजानन साखर कारखान्याच्या गाळप हंगाम २०२४-२५ च्या मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम बुधवारी (दि.३१) रोजी पार पडला. मागील तीन वर्षांपूर्वी अनेक अडचणी आणि आव्हानांना मात देत आ.संदीप क्षीरसागर यांनी गजानन साखर कारखाना सुरू केला आहे. शेतकरी आणि सर्वसामान्य सभासदांच्या पाठबळावर गेल्या दोन गाळप हंगामात यशस्वीपणे ऊसाचे गाळप करून भागातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना झाला आहे. आता येणार्या २०२४-२५ गाळप हंगामातही जास्तीत जास्त ऊसाचे वेळेत गाळप करण्यासाठी कारखाना प्रशासन तत्पर असणार आहे. ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना हक्काचा कारखाना, आपल्या प्रयत्नांतून उपलब्ध झाल्याचे मनस्वी समाधान असल्याच्या भावना आ.क्षीरसागर यांनी व्यक्त केल्या. मिल रोलर पूजनाच्या कार्यक्रमासाठी आ.संदीप क्षीरसागर यांच्यासह महंत अमृतदासजी जोशी महाराज, माजी आ.सय्यद सलीम तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, कारखाना प्रशासनाचे अधिकारी-कर्मचारी, पंचक्रोशीतील शेतकरी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT